# इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया, पुणे

## जाहिर आवाहन

दि.०७.१०.२०१६.

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील इ. ११ वी प्रवेश शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून ऑनलाईन पध्दतीने होत आहेत. मा. उच्च न्यायालय, मुंबई व शासन निर्णय दि. २८.०३.२०१६ नुसार यावर्षीची (२०१६-१७) प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन झालेली आहे. तसेच यापुढील इ. ११ वी ची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने होणार आहे. इ. ११ वी ऑनलाईन प्रवेशाचे तिसरे वर्ष आहे, दरवर्षी प्रवेश प्रक्रियेच्या बाबतीत आवश्यक ते बदल होत आहेत, ज्यामुळे प्रवेश प्रक्रियेमध्ये पारदर्शकता येऊन विद्यार्थी, पालक व महाविद्यालये यांचेसाठी प्रवेश प्रक्रिया आधिकाधिक सुटसूटीत, सोपी व सोईस्कर होणेसाठी प्रयत्न केले जात आहेत.

यापुढील ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये अधिकाधिक सुलभता आणण्यासाठी प्रवेश प्रक्रियेशी संबधित अनेक घटकांकडून मार्गदर्शक सूचना मागविण्यात येत आहेत. यामध्ये शिक्षण तज्ञ, सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी , माजी प्राचार्य , शिक्षक, विविध विद्यार्थी संघटना, पालक-विद्यार्थी तसेच आयटी तज्ञ, संगणक प्रणाली तज्ञ, इत्यादी सर्वांकडून शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे या कार्यालयात ठेवण्यात आलेल्या सुचना पेटीत लेखी स्वरुपात किंवा या कार्यालयाच्या इ.११वी ऑनलाईन प्रवेशाच्या 11thonlineadmissiondydpune@gmail.com ई-मेल आयडीवर दाखल कराव्यात असे आवाहन इ.११वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समितीकडून करण्यात येत आहे.

सदरचे प्रसिध्दीपत्रक शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे या कार्यालयाच्या www.dydepune.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(दिनकर टेमकर)<br>
अध्यक्ष<br>
इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती<br>
तथा<br>
शिक्षण उपसंचालक<br>
पुणे विभाग पुणे-१